International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# “ताराबाई शिंदे लिखित (स्त्री–पुरुष तुलना) सुधारणा चळवळी स्त्रियांच्या मानवी हक्कांचा लढा”

**श्रीमती सुखदा सदाशिव ऱ्हाटवळ**
ए-५, वृंदावन रेसिडेन्सी,
राजोपाध्येनगर, कोल्हापूर
*Corresponding Author - श्रीमती सुखदा सदाशिव ऱ्हाटवळ*

**प्रस्तावना :**

भारतीय समाजरचनेचा विचार करताना महत्त्वाची एक गोष्ट येते ती म्हणजे भारतीय समाज हा स्त्री आणि पुरुष या दोन अंगांनी बनला आहे. त्यामुळे पुरुषाइतकेच महत्त्वाचे स्त्रीलाही असावयास हवे परंतु ते चित्र या समाजरचनेत दिसत नाही. स्त्रीकडे पाहण्याचा भारतीयांचा दृष्टिकोन मात्र संकुचिनल असलेला दिसून येतो. या स्त्रीला नेहमीच दुय्यम स्थान दिले गेले आहे. त्यामुळे या समाजाचा सर्वांगिण विकास होण्याच्या कामात अनेक अडथळे आलेले दिसतात. वास्तविक पाहता मनुष्य प्राणी या नात्याने पुरुष इतक्याच स्त्रियाही महत्त्वाच्या ठरतात. स्त्री आणि पुरुष हे दोन्ही घटक परस्पर पूरक असेच आहेत. एकमेकांच्या सहकार्याशिवाय, मदतीशिवाय त्यांचे जीवन हे अपुरेच ठरते. म्हणूनच म्हटले जाते की स्त्री आणि पुरुष ही रथाची दोन चाके आहेत. हा संसाररूपी जीवनरथ व्यवस्थित चालावयाचा असेल तर पुरुषाइतके स्त्रीलाही महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे. परंतु प्रत्यक्षात मात्र पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना या समाज रचनेत ही दर्जाची वागणूक दिली जात आहे. तिला तिच्या नैसर्गिक हक्कांपासून दूर ठेवण्यात आले. स्त्रियांना मानवी हक्कांपासून वंचित ठेवल्यामुळे स्त्रियांच्या विकासाला तर पायबंद बसलाच पण त्याचबरोबर संपूर्ण मानवजातीच्या प्रगतीलाही खीळ बसली. त्यामुळे स्त्रीचा दर्जा सुधारण्याशिवाय, तिचे अज्ञान दूर केल्याशिवाय समाजाचा विकास होणार नाही. याची जाणीव १९ व्या शतकातील सुधारकांना झाली आणि त्यातूनच अनेक स्त्री सुधारणाविषयी चळवळी अस्तितत आल्या आहेत.

**उद्देश :**

१. १९ व्या शतकातील स्त्रीचे सामाजिक स्थान समजून घेणे.

२. १९ व्या शतकातील स्त्री सुधारणाविषयक चळवळींचा आढावा घेणे.

३. ताराबाई शिंदे लिखित 'स्त्री-पुरुष तुलना' निबंध लेखनातून चित्रित झालेल्या स्त्रियांच्या हक्कांचा आढावा घेणे.

**अभ्यास पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा वापर करण्यात आलेला आहे.१९ व्या शतकात ब्रिटिशांचे आगमन भारतात झाले. त्यांनी येथे शिक्षणप्रणाली सुरू केली आणि शिक्षण घेऊन सुशिक्षित झालेली तरुण पिढी आपल्या समाजव्यवस्थेविषयी विचार करू लागली. या समाजाचे महत्त्वाचे अंग असणाऱ्या स्त्रीला अज्ञानातून बाहेर काढणे महत्त्वाचे आहे आणि हे अज्ञान केवळ शिक्षणामुळेच दूर होईल. याची खात्री तत्कालीन समाजसुधारकांना होती. त्यातूनच त्यांनी अनेक चळवळ सुरू केल्या त्या पुढीलप्रमाणे.

**१) स्त्री शिक्षण :**

आपल्या भारतीय समाजातील स्त्रिया ह्या सर्व अनिष्ठ चाली-रितींचा स्वीकार करून जीवन जगत आल्या. त्यापाठीमागे त्यांची एकच श्रद्धा होती ती म्हणजे हे गेल्या जन्मीचे दु:खभोग आहेत आणि ते भोगून झाले तरच पुढच्या जन्मी सुखाचे दिवस येतील या मानसिकतेमध्येच ती वावरत होती. तिला ह्या मानसिकतेमधून बाजूला काढून तिची या दृष्ट रूढींच्यामधून सुटका करण्याचे काम सुधारकांनी केले. या सुधारणेला स्त्री मुळात अनुकूल झाली पाहिजे. तिची मानसिकता बदलली पाहिजे, त्यासाठी तिला शिक्षण देणे महत्त्वाचे होते म्हणजेच स्त्रीच्या विकासासाठी शिक्षण हे एक प्रभावी साधन आहे. याची जाणीव सुधारकांना झाली. या शिक्षणामुळे स्त्रीला वैधव्य आले, तर किंवा नवऱ्याने टाकले तर तिला उदरनिर्वाहाची सोय करता येईल. कोणा पुरुषावर तिला अवलंबून रहावे लागू नये. या शिक्षणामुळे तिचा स्वत:कडे व स्वत:च्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेल ही खात्री सुधारकांना होती म्हणून त्यांनी स्त्री शिक्षणास चालना दिली.

**२) बालविवाह :**

सुरुवातीपासूनच स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन हा दुय्यम असल्यामुळे घरात मुलगी जन्मणे म्हणजे वाईट असा समाज तत्कालीन समाजाचा होता. ही मुलगी वयात आल्यानंतर काहीतरी वाईट कृत्य करेल आणि आपल्या घराण्याला गालबोट लागेल म्हणून या मुलीचा विवाह हा तिच्या नकळत्या वयात म्हणजेच वयाच्या ८ व्या, ९ व्या वर्षात केला जात असे आणि काही वेळा हा विवाह पाळण्याला बाशिंग बांधून पाळण्यातच केला जात असे. मुलीच्या खेळण्या-बागडण्याच्या वयातच तिला लग्नबंधनात अडकवल्यामुळे तिची शारीरिक व मानसिक हानी मोठ्या प्रमाणात होत होती. मुलीची या जाचक रूढीतून मुक्तता होण्यासाठी

सुधारकांनी प्रयत्न केले आणि त्यातूनच संमती वयाचा कायदा आणि त्याचबरोबर बालविवाह प्रतिबंध कायदा अस्ततीत्वात आला आहे.

**३) पुनर्विवाह/विधवा विवाह :**

१९ व्या शतकात बाल विवाहाची प्रथा होती. या विवाहात ८-९ वर्षाच्या मुलीचा विवाह वृद्धाशी लावला जात असे. त्यामुळे मुलीच्या ऐन तारुण्यात तिच्या पतीचे निधन होत असे. त्यामुळे या मुलींना संसारसुखापासून दूर रहावे लागत असे. स्त्रीला ह्या संसारसुखापासून दूर ठेवण्यासाठी तिला पुनर्विवाह करता येत नसे. पुरुषाला मात्र पुनर्विवाह करण्याचा अधिकार होता. स्त्रीही देखील एक व्यक्ती आहे तिलाह मन आणि भावना आहेत. त्यामुळे अशा विधवा स्त्रियांच्या भावना कोंडून ठेवून त्याचा उद्रेक होण्यापेक्षा त्यांना पुनर्विवाह करण्यास परवानगी द्यावी, यासाठी सुधारकांनी लढा उभारला आणि त्यातून विधवा विवाहाचा कायदा अस्तीत्वात आला.

**४) केशवपन :**

१९ व्या शतकातील विधवेच्या वाट्याला जे अनेक दु:खभोग आले होते, त्यापैकीच एक म्हणजे केशवपन होय. यालाच सोवळी करणे असेही म्हटले जाते. ज्या स्त्रीला वैधव्य प्राप्त होते अशा स्त्रीवर दुसऱ्या कोणत्याही परपुरुषाची नजर पडू नये व तिच्याकडून कोणताही व्यभिचार घडू नये म्हणून तिच्या सौंदर्याचा एक भाग म्हणजे तिच्या डोक्यावरील केस तेच सर्व काढून टाकले जात असे आणि तिचे सौंदर्यच नष्ट केले जात असे. ही प्रथा अत्यंत वाईट होती. त्यामुळे या विरोधातही सुधारकांनी आपला आवाज उठवलेला दिसतो.

**५) सतीप्रथा :**

१९ व्या शतकातील सती प्रथा ही बंगाल इतकी महाराष्ट्रात तीव्र नसली तरी काही प्रमाणात ती जाणवत होती. कारण महाराष्ट्रातही सती गेलेल्या स्त्रियांची उदाहरणे आहेत. बंगालमध्ये लागू असणाऱ्या 'दायभाग' कायद्यानुसार स्त्रियांना मालमत्तेचा अधिकार दिला होता. त्यामुळे बंगालमध्ये पतीच्या निधनानंतर तिला मालमत्तेचा अधिकार द्यावा लागू नये म्हणून पतीच्या निधनानंत पतीच्या चितेवरच स्त्रीला जीवंत जाळले जात होते. त्यामुळे बंगालमध्ये सतीच्या प्रथेने उग्र रूप धारण केले होते आणि त्याचे लोन इतर भागातही पसरलेले दिसून येते. जीवंत मरण स्त्रीला भोगावे लागत होते. त्यामुळे त्यांना किती वेदना सहन कराव्या लागत होत्या याची कल्पनाही करता येत नाही. म्हणून राजा राममोहन राय यांच्या प्रयत्नामुळे सतीबंदीचा कायदा अस्तीत्वात आला.

१९ व्या शतकातील या सुधारणाविषयी चळवळींचा परिणाम स्त्रियांवर झालेला दिसतो. शिक्षण घेऊन सुशिक्षित झालेल्या स्त्रियांना आत्मभान आलेले दिसते. त्यातूनच स्वत:वर

स्वजातीय स्त्रीवर्गावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम काही स्त्रियांनी केलेले आहे. त्यापैकीच एक ताराबाई शिंदे या होय. विजयालक्ष्मी खटल्याचे वृत्त ताराबाईंच्या वाचनात येते आणि ताराबाई विचारप्रवृत्त होऊन लेखनी हातात घेऊन आपले विचार 'स्त्री–पुरुष तुलना' या आपल्या निबंधाच्या साह्याने व्यक्त करतात. ताराबाई शिंदे यांचा हा शोध निबंध म्हणजे स्त्रियांच्या जीवनाशी निगडित असणाऱ्या अनेक समस्यांची कैफियतच आहे. विधवाविवाहाला विरोध, त्यामुळे होणारे दुष्परिणाम, स्त्रियांच्या वावरण्यावर येणारी नियंत्रणे, कौटुंबिक राजकारण, स्त्रीला दैनंदिन जीवनात पडणारे पेच अशा अनेक प्रश्नांशी निगडित 'स्त्री–पुरुष तुलनाची' संहिता आहे. या समाज व्यवस्थेत स्त्री आणि पुरुष हे दोघे एकमेकांस पूरक असून दोघेही महत्त्वाची असूनही स्त्रियांना आणि पुरुषांना वेगवेगळा न्याय का? हा प्रश्न ताराबाईंना अस्वस्थ करतो. स्त्रिया ही जणू पुरुषांची उपजात असल्याप्रमाणे दिली जाणारी वागणूक त्यांना अस्वस्थ करते. नवऱ्याची एक बायको मेली की दुसरी बायको तो करतो. पण बायकोचा नवरा मेला तर तिला दुसरा नवरा करण्याचा अधिकार नाही. बायकोने सती जावे पण नवऱ्याने नाही, स्त्रीला व्यभिचारातून अपत्य झाले तर तिला सजा, पण पुरुषाने व्यभिचार केला तर त्याला सजा नाही. त्यांच्या माथी कोणताही कलंक नाही. स्त्रीने इकडे तिकडे नजर फिरवली तर ती उठबस आणि पुरुषाने अन्य स्त्रियांची अभिलाषा धरली त ते पौरूष अशा प्रकारे स्त्रिया आणि पुरुष यांच्या अधिकारामध्ये केला जाणारा भेद आणि अशी असणारी मूल्यव्यवस्था यालाच ताराबाईंनी आपल्या या शोधनिबंधातून आव्हान दिले आहे आणि स्त्रियांच्या मूलभूत हक्कांची जाणीव करून दिली आहे. ताराबाई शिंदे यांनी स्त्री–पुरुष तुलना या आपल्या शोध निबंधाचे विभाजन तीन भागात केले ते पुढीलप्रमाणे –

१) ताराबाईंनी या पहिल्या भागात विवाहित व विधवा स्त्रीच्या वाट्याला येणारे दुःख चित्रित केले आहे. विधवा स्त्रीच्या बाबतीत आपले विचार व्यक्त करताना त्यांनी विधवांना पुनर्विवाह करण्यास बंदी असल्यामुळे त्यांना काय दुःख सहन करावे लागते याचे चित्रण केले आहे. लाखो कोट्यावधी स्त्रीच्या वैधव्याचे असह्य दुःख कसे भोगतात व त्यापासून कसे अनर्थ होतात, या बाबतीत पुरुष जातीने केवढा अन्याय केला आहे याचे तपशीलवार चित्रण या भागात ताराबाई शिंदे करतात.

२) विवाहित स्त्रीचे होणारे शोषण हा या पुस्तकाचा दुसरा भाग आहे. विवाहित स्त्रीच्या वाट्याला दुःख येते ते तिच्या जन्मापासून विवाहासारख्या महत्त्वाच्या घटनेतही स्त्रीचे मत विचारात घेतले

जात नाहीत. स्त्रीच्या जीवनाला वळण देणारी महत्त्वाची घटना म्हणजे तिचा विवाह होय. तोही तिच्या मतानुसार होत नाही. तर घरातील वडीलधारी पुरुष मंडळीच तिच्या विवाहाचा निर्णय घेतात. तिच्या विवाहाच्याही चार तऱ्हा त्यांनी या भागात मांडल्या आहेत.

३) तिसऱ्या भागात पुरुषांमधील असणाऱ्या दुर्गुणांचे वर्णन ताराबाई करतात. स्वत: अनेक दुर्गुणांनी भरलेले पुरुष सोयीस्करपणे त्याकडे दुर्लक्ष करून दुर्गुणी म्हणून स्त्रियांनाच धारेवर धरणाऱ्या पुरुषांवर कठोर आघात केला आहे. पुरुषांचे दगाबाजीने वागणे ताराबाईंना विलक्षण संतापजनक होते. स्त्रीला फूस लावणे, नाना प्रलोभने दाखवून मोहात पाडणे, खोट्यानाट्या प्रेमाचा आभास निर्माण करून आपले मनोवांच्छित पुरे होईपर्यंत पुरुष तिच्या पुढे-पुढे करतात आणि आपल्या दुष्ट कामवासनेची पूर्ती होऊन स्त्री एकदा गर्भवती झाली म्हणजे ''तू केलेस ते भोग'' असे उत्तर देऊन तिच्याकडे पाठ फिरवतात याचा ताराबाईंना संताप येतो. त्यामुळेच त्या उद्‌गारतात, ''तुमच्यापेक्षा सर्प बरा. तो डसल्याबरोबर प्राण तरी जातो. पण तुमचेजवळ जे विष आहे ते नित्य नित्य शरीरास असह्य दु:ख देऊन प्राण घेतो.'' (ताराबाई शिंदे लिखित - स्त्री-पुरुष तुलना पृष्ठ ४३) यासारख्या अनेक दुर्गुणांची उदा. त्यांनी या भागात दिली आहेत.

ताराबाई शिंदे यांनी स्त्री-पुरुष तुलना या आपल्या निबंध लेखनाने हेच दाखवून दिले आहे की आपत्कालीन कालखंडातील स्त्रीच्या वाट्याला आलेले दु:खभोग त्यामुळे तिच्या स्वातंत्र्याचा झालेला संकोच समजातील तीचे असणारे नगण्य स्थान अधोरेखित झाले असले तरी वास्तविक पाहता तिचं पुरुषांपेक्षा अधिक असणारे श्रेष्ठत्वच सर्वांच्या समोर आले. त्यामुळे स्त्रीला स्वतंत्र सन्मानाचे हक्काचे आणि पुरुषांच्या बरोबरीचे स्थान आहे हे सांगून तिला तिचे मूलभूत हक्क मिळाले पाहिजेत याची जाणीव समाजाला करून दिली असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. विवाहाचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य, विधवा विवाहाला मान्यता स्त्रीला अभिव्यक्तीने स्वातंत्र्य इत्यादी तिचे म्हणून हक्क मिळवून देण्यात ताराबाईंचा महत्त्वाचा वाटा आहे.

**निष्कर्ष :**

संयुक्त राष्ट्राच्या मानवी हक्क विषयक जाहिरनाम्यात स्त्री-पुरुषांच्या समान हक्कांच्या तत्त्वाचा समावेश केला आहे. या जाहिरनाम्यातील हक्क व स्वातंत्र्य प्राप्त

करण्यास प्रत्येकजण पात्र आहे. लिंगभेद विचारात न घेता प्रत्येक मानवाला सर्व प्रकारच्या मानवी हक्कांचा लाभ मिळाला पाहिजे असे नमूद केले आहे. त्यातूनच स्त्रियांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या समस्या दूर करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी १९४७ मध्ये 'महिला आयोगाची' स्थापना केली. पण या स्त्रियांच्या हक्कांच्या मागणीची सुरुवात १९ व्या शतकातच झाली होती. हजारो वर्षे स्त्रीला तिच्या हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले त्या स्त्रीला तिचे हक्क मिळाले पाहिजेत याविषयीचा आवाज समाजसुधारकांनी १९ व्या शकतानच उठविला होता. म्हणूनच १९ वे शतक हे प्रबोधनाचे, जागृतीचे शतक म्हणून ओळखले गेले.

**संदर्भ :**


१) खोले विलास (संपादक) : ताराबाई शिंदे लिखित स्त्री–पुरुष तुलन प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वि. आ. १९९९.

२) कुलकर्णी पी. के. : मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्र. आ. २०१३.

३) पाटील व्ही. बी. : मानवी हक्क, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, नववी आ. २०१३.

४) साने गीता : भारतीय स्त्री जीवन, मौज प्रकाशन, मुंबई.

५) कऱ्हाडे सदा : 'दलित साहित्य चिकित्सा', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००७.

६) तेंडुलकर चित्रा : यांच्या समग्र नाटकातील स्त्री व्यक्तिरेखांचा अभ्यास, वर्तक वैशाली, जून २००६.

७) भागवत वंदना : 'स्त्री वाद', शब्द प्रकाशन, मुंबई, २०१४.

८) शरयु अनंतराम : 'भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८७.